POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२२५ ● मुंबई, मंगळवार, १८ मार्च २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

नागपूरमधील राड्याबाबत आमदाराचा मोठा दावा
मुख्यमंत्र्यांनी तातडीची बैठक बोलावली

सरकारच्या आवाहनाला बळी पडू नका

आमदार प्रशांत जगताप यांनीही यावर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. नागपूरची घटना दुदेर्वी आहे. राज्यात विस्फोटक परिस्थिती निर्माण झालीय. राज्याला शांतता हवीय की दंगली? नवीन उद्योग येऊ घातले असतानाच सकारात्मक वातावरण होण्यास छेद लागला आहे. नागरिकांचे महागाई ऐवजी इतर मुद्द्यांवर लक्ष नेले जातेय. नागपुरातील परिस्थिती नियंत्रणात आणा. अन्यथा सामान्य मतदार रस्त्यावर उतरतील. सत्ताधाऱ्यांच्या आवाहनाला बळी पडू नका असे आवाहन आहे. मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागतेय त्यावरून लक्ष विचलित केले जातेय. येत्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका आहेत. त्यामुळे हे असं मुद्दामही केलं जातंय का हे पहावं लागेल, असं प्रशांत जगताप म्हणाले.

शांततेचं सहकार्य करा

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. नागपूर येथील महाल भागात दगडफेकीच्या दुर्दैवी घटनेतून तणावग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, याची पुरेपूर दक्षता पोलीस प्रशासन घेत आहे. माझे सर्व नागपूरकरांना नम्र आवाहन आहे की, कृपया आपण सर्वांनी देखील प्रशासनाला सहकार्य करावे. नागपूर शहराचे सुजाण नागरिक या नात्याने शहरात कसलाही अनुचित प्रकार घडणार नाही, ही आपली जबाबदारी आहे. सामाजिक सलोख्याचे प्रतीक म्हणून नागपूर शहराकडे पाहिले जाते. ही शहराची परंपरा आपण सर्वांनी जपावी. तसेच, प्रशासनावर संपूर्ण विश्वास ठेवत कुठल्याही अफवांना बळी न पडता, नागपूर शहरामध्ये शांतता नांदण्यासाठी सहकार्य करावे, ही विनंती, असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे.

संयम बाळगावा

राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनीही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. कुठल्याही गैरसमज किंवा खोट्या बातम्यांना बळी पडू नका. प्रशासन भक्कमपणे परिस्थिती हाताळत असून आम्ही सर्वजण परिस्थितीवर पूर्णपणे लक्ष ठेऊन आहोत. सातत्याने आम्ही पोलीस प्रशासनाची संपर्कात असून, त्यांना नागरिकांनी सहकार्य करावे. सामाजिक एकोपा हे आपल्या महाराष्ट्राची ताकद असून अशावेळी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका आणि प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करा, असं आवाहन योगेश कदम यांनी केलं आहे.

सागर बंगल्यावर बैठक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यात सागर बंगल्यावर महत्वाची बैठक सुरू आहे. नागपूर प्रकरण शांत कसं होईल आणि जे समाज कंटक आहेत यांच्यावर अंकुश कसा लावावं या बाबत स्थानिक अधिकाऱ्यांसोबत दोन्ही नेत्यांची चर्चा सुरू आहे.

■नागपूर। प्रतिनिधी :

औरंगजेबाच्या कबरीचा वाद चांगला पेटला आहे. नागपूरमध्ये तर या मुद्द्यावरून दोन गटात मोठा राडा झाला. दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केली, त्यानंतर वाहनांची तोडफोड करत अनेक वाहने पेटवून दिली. त्यामुळे नागपूरच्या महल भागात तणावाचं वातावरण निर्माण झालं. या दगडफेकीत ८-१० पोलीस जखमी झाले असून अग्निशमन दलाचे चार जवान जखमी झाले आहेत. तर या हल्ल्याप्रकरणी आतापर्यंत ३० संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र, भाजपचे स्थानिक आमदारांनी बाहेरून आलेल्यांनीच घरेदारे पेटवल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. नागपूरमध्यचे आमदार प्रवीण दटके यांनी हा दावा केला आहे. सकाळी एक आंदोलन झालं, पण पोलिसांनी त्यात मध्यस्थी केली. रात्री महाल परिसर आणि इतर परिसरात दगडफेक करण्यात आली. वाहनांची जाळपोळ करण्यात आली. अग्निशमन दलाच्या जवानांना मारहाण करण्यात आली. बाहेरून आलेल्या लोकांनी सामान्य लोकांची घरे पेटवली. टिपून दगडफेक करण्यात आली आहे, असा दावा प्रवीण दटके यांनी केला आहे.

या दगडफेकीनंतर पोलिसांनी कोबिंग ऑपरेशन सुरु केले आहे. या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. या ठिकाणांवरुन अनेक जणांना ताब्यात घेतले आहे. या ठिकाणी आता परिस्थिती नियंत्रणात आहे. कोणीही कायदा हातात घेऊ नये असे आवाहन पोलिस आयुक्त रविंद्र कुमार सिंगल यांनी केले आहे. आमच्याकडे एक एसआरपीएफची कंपनी होती इतर तीन कंपन्या बोलविण्यात आल्या आहेत अशी माहिती त्यांनी दिली आहे.

पोलिसांचे कोबिंग ऑपरेशन सुरु
महाल भागात दंगल नियंत्रण पथक दाखल

नागपूरात औरंगजेब याच्या कबरी प्रकरणात विश्व हिंदू परिषदेने काढलेल्या मोचार्नंतर सायंकाळी दोन गटात तुफान दगडफेक झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत दोन्ही गटांकडून एकमेकांवर दगडफेक झाल्याने या जमावावा आवरताना पोलिस आणि नागरिक जखमी झाले आहेत. या घटनेनंतर आता पोलिसांना दंगल नियंत्रण पथकाला पाचारण केले असून उपराजधानी नागपुरच्या महाल परिसरात कोबिंग ऑपरेशन सुरु केले आहे. राज्यात 'छावा' चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर अचानक औरंगजेबाची कबर काढण्यासंदर्भात राज्य सरकारमधील अनेक मंत्र्यांनी वक्तव्ये केली होती. त्यावरुन राजकारण सुरु असताना आज नागपूरात विश्व हिंदू परिषदेने मोर्चा काढला होता. या मोर्चात औरंगजेबाची प्रतिकात्मक कबरचे प्रतिकात्मक दहन करण्यात आले. त्यानंतर तणाव निर्माण झाला होता. त्यावेळी पोलिसांनी मध्यस्थी केल्याने हा तणाव निवळला. परंतू सायंकाळी पुन्हा दोन गटात महाल परिसरात दगडफेक सरु करण्यात आली. यावेळी दोन्ही बाजूंनी दगडांचा मारा करण्यात आला. पोलिसांनी यावेळी जमावाला नियंत्रणात आणण्यासाठी अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडल्या.यावेळी जमावाने दोन जेसीबींना जाळण्यात आल्या. या दगडफेकीत १० ते १५ पोलिसही जखमी झाले आहेत.

औरंगजेबाच्या कबरीच्या आंदोलनावरून तणाव... २ गटांमध्ये दगडफेक, जाळपोळ

नागपुरातील महाल भागात तरुणांच्या दोन गटांमध्ये झालेल्या वादानंतर तणावपूर्ण स्थिती निर्माण होणे दुदेर्वी असून, नागपूरकरांनी शांतता बाळगून प्रशासनाला परिस्थिती हाताळण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन नागपूरचे खासदार आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे. नागपूर हे शांतता आणि सौहादार्साठी देशभरात प्रसिद्ध असलेले शहर आहे. या शहरात जात-पंथ-धर्म या विषयावरून वाद किंवा भांडणे होत नाहीत. आज जे काही घडले, त्यासंबंधी प्रशासन कार्यवाही करेलच. नागपूरच्या सर्व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे आणि शांतता प्रस्थापित होईल यासाठी स्वतः देखील प्रयत्न करावेत, असे गडकरी यांनी म्हटलं आहे.

नागपूरमध्ये औरंगजेबाच्या कबरीच्या वादावरून दोन गटांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. महाल परिसरामध्ये दोन गट आमने सामने आले आहेत. सकाळी औरंगजेबाच्या कबरीविरोधात दोन गटाकडून आंदोलन करण्यात आलं होतं, यानंतर संध्याकाळी दोन गट आमने-सामने आले आणि परिस्थिती हाताबाहेर गेली. संतप्त जमावाने दगडफेक करत काही वाहनांची तोडफोडही करून जाळपोळ केली. महाल परिसरामध्ये तणाव वाढल्यानंतर पोलिसांनी कडक बंदोबस्त तैनात करण्यात आलाय. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रू धुराच्या नळकांड्या फोडल्याच सांगण्यात आलंय. दोन गटांमधील दगडफेकीत काही पोलीस जखमी असल्याची माहिती मिळाली आहे. तर कुणीही कायदा हात घेऊन नये आणि अफवांवर विश्वास ठेवू नये असं आवाहन नागपूर पोलिसांनी केलंय. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरकरांना शांततेचे आवाहन केलंय. नागपुरातील महाल परिसरात दगडफेक आणि तणावपूर्ण स्थिती निर्माण झाल्यावर पोलीस प्रशासन परिस्थिती हाताळत आहेत. या परिस्थितीत नागरिकांनी प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. आपण सातत्याने पोलीस प्रशासनाशी संपर्कात असून, त्यांना नागरिकांनी सहकार्य करावे. नागपूर हे शांतताप्रिय आणि एकमेकांच्या सुखदुखाःत सहभागी होणारे शहर आहे. ही नागपूरची कायम परंपरा राहिली आहे. अशावेळी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नका आणि प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर सर्वांसाठी अभिमानास्पद अन् प्रेरणादायी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिवक्षेत्र मराडे पाडा, भिवंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर (शक्तीपीठ) लोकार्पण संपन्न

■नागपूर। प्रतिनिधी :

देव, देश अन् धर्मापायी ज्या राजाने आपले संपूर्ण आयुष्य खर्ची पाडले, सर्वांसाठी दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांचे मंदिर होणे, ही अतिशय अभिमानाची बाब असून सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. येथे महाराजांच्या दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिवक्षेत्र मराडे पाडा, ता.भिवंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर (शक्तीपीठ) लोकार्पण संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज, प.पू. बालयोगी सदानंद बाबा, ह.भ.प डॉ.कैलास महाराज निचिते, राष्ट्रसंत नीलकंठ शिवाचार्य, प.पू. आलोकनाथ महाराज, खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार किसन कथोरे, आमदार दौलत दरोडा, आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश चौघुले, शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजू चौधरी, श्री.विश्वनाथ पाटील, नरेंद्र पवार, जितेंद्र डाकी, विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र संजय दराडे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस. स्वामी, श्री.अनंता भोईर, आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा देत त्यांनी कैलास निचिते व राजू चौधरी यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य मंदिराच्या संकल्पना व प्रत्यक्ष निमार्णाकरिता कौतुक केले. ते म्हणाले की, आपण छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच आपल्या इष्ट देवतेचे मंदिरात जावून दर्शन घेवू शकतो. देव, देश अन् धमार्पायी ज्या राजाने आपले संपूर्ण आयुष्य खर्ची पाडले, त्यांचे मंदिर होणे, ही अतिशय अभिमानाची बाब आहे. अतिशय सुंदर, भव्य दिव्य असे हे मंदिर निर्माण करण्यात आले आहे. या मंदिराला सुंदर तटबंदी आहे, अतिशय चांगले बुरुज आहे, दर्शनीय अशा प्रकारचा प्रवेशाचा मार्ग, बगीचा आहे आणि या मंदिराच्या माध्यमातून महाराजांच्या जन्मापासून ते राज्याभिषेक आणि पुढे संभाजी महाराजांची वाटचाल असे अतिशय सुरेख प्रसंग उभे करण्यात आले आहेत. यातून प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे. जसे हनुमानाचे दर्शन घेतल्याशिवाय प्रभू श्रीरामांचे दर्शन पूर्ण होत नाही तसेच छत्रपती शिवरायांच्या दर्शनाशिवाय कुठल्याच देवाचे दर्शन पूर्णत्वास येत नाही.

आई जिजाऊंच्या संस्कारांनी अन् आशिवार्दाने शिवबा घडले. त्यांच्या प्रेरणादायी शिकवणीतूनच शिवरायांनी मुघलांच्या आव्हानांचा प्रतिकार करायला सुरुवात केली. प्रभू श्रीराम हे युगपुरुष होते. त्यांनी समाजातील सर्वात शेवटच्या व्यक्तीमध्ये अन्यायाविरुद्ध लढण्याची शक्ती निर्माण केली. त्याप्रमाणेच छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आहे. रावणाविरुद्ध लढताना जसे श्रीरामांनी सर्वसामान्यांना एकत्र केले तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांच्या बलाढ्य फौजेविरुद्ध सर्वसामान्य जनतेतून शक्ती निर्माण केली आणि भगवा झेंडा फडकविला. जातीपातीत विभागलेला महाराष्ट्र महाराजांना अपेक्षित नाही. देव, देश आणि धमार्पायी सर्वस्व पणाला लावणारा, देशाचा गौरव वाढविण्याचा संकल्प करणारा महाराष्ट्र आपल्याला घडवायचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची ३०० वी जन्मशताब्दी साजरी होत असताना देश घडविण्याच्या कार्यात आपले योगदान देवू या, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, राज्य व केंद्र शासनाकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा किल्ल्यांचा जागतिक वारसा म्हणून नोंद होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. संगमेश्वर येथे देखील छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात येणार असून त्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. पानिपत येथील लढाई सर्वांना माहितच आहे. महादजी शिंदे यांनी गाजविलेला पराक्रम सर्वांना माहीत आहे. त्या ठिकाणीही भव्य स्मारक उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

आज लोकार्पण झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या या शक्तीपिठाला तीर्थस्थळाचा दर्जा देण्यात येईल. त्याचप्रमाणे भिवंडी-वाडा या रस्याचे कामही प्रगतीपथावर आहे. येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने या शक्तीपिठाकडील येणाऱ्या सर्व मार्गांचे नियोजन उत्तमरित्या करावे, येथे येणाऱ्या शिवप्रेमींसाठी आवश्यक सोयीसुविधा तयार कराव्यात. शासन यासाठी तत्पर असून याकरिता निधीची कमतरता पडणार नाही. कार्यक्रमाच्या सुरुवातीस आयोजन समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शाल, पुष्पगुच्छ आणि लोकार्पण झालेल्या मंदिराची प्रतिकृती देवून सत्कार केला.

या लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील व आमदार किसन कथोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

नवी मुंबईतील विमानतळाबाबत मोठी अपडेट!
गौतम अदानी यांनी जाहीर केली उद्घाटनाची तारीख

■बीड। प्रतिनिधी :

नवी मुंबई विमानतळाबाबात मोठी अपडेट समोर आली आहे. नवी मुंबई विमानतळाचे काम हे जवळपास पूर्ण झाले. आता प्रतिक्षा आहे ती नवी मुंबई विमानतळाच्या उद्घाटनाची. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची जबाबदारी अदानी समूहाकडे आहे. अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला भेट दिली आणि प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी गौतम अदानी यांनी नवी मुंबई विमानतळाच्या उद्घाटनाची तारीख जाहीर केली. नवी मुंबई विमानतळ प्रकल्प हा अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड आणि महाराष्ट्र शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ यांचा संयुक्त उपक्रम आहे. यामध्ये, AAHL ची ७४ टक्के तर सिडकोची २६ टक्के भागिदारी आहे.

या विमानतळाचा रनवे ३.७ किमी इतका लांब असून या विमातळावर एकाचवेळी ३५० विमाने उभी राहू शकतात. हे विमानतळ पूर्णपणे कार्यन्वित झाल्यानंतर वर्षाला ९ कोटींहून अधिक प्रवासी प्रवास करु शकतात. या विमानतळाचा पहिला टप्पा एप्रिल २०२५ पर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर २०२९ पर्यंत दुसरा टप्पा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तर, तिसरा टप्पा २०३२ पर्यंत आणि चौथा टप्पा २०३६ पर्यंत पूर्ण होईल.

फेब्रुवारी २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकल्पाची पायाभरणी केली. १६,७०० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेले हे विमानतळ हे मुंबईच्या मुख्य विमानतळावरील गर्दी कमी करण्याची उभारण्यात येत आहे. हे विमानतळ भारतातील वाढत्या हवाई वाहतुकीच्या मागणीला पूर्ण करेल असा विश्वास गौतम अदानी यांनी व्यक्त केला आहे.

नवी मुंबई विमानतळ हे भारताच्या विमान वाहतूक भविष्याची एक झलक आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे बांधकाम हे जागतिक दजार्चे आहे. हवाई कनेक्टिव्हिटीचे सर्वोत्तम पर्याय ठरणार आहे. हे विमानतळ भारतासाठी एक भेट आहे. जून महिन्यात नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन होईल अशी घोषणा गौतम अदानी यांनी केली.

डिसेंबर २०२३ मध्ये, अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे सीईओ अरुण बन्सल यांनी एप्रिल महिन्यात नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन होईल अशी घोषणा केली होती. १७ एप्रिल रोजी या विमानतळाचे व्यावसायिक उद्घाटन होणार होईल. मे महिन्याच्या दुसऱ्या सहामाहीत देशांतर्गत उड्डाणे पुन्हा सुरू होतील, तर जुलैच्या अखेरीस आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू होणार होतील असे ते म्हणाले होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ १ हजार १६० एकरवर पसरलंय. वाढत्या प्रवाशांच्या संख्येमुळे नवी मुंबई विमानतळाची उभारणी केली. विमानतळावर दोन रनवे तयार करण्यात आले आहेत. ठाणे, कल्याण, रायगड, पुण्याच्या प्रवाशांना विमानतळाचा फायदा होणार आहे.

संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

लोकशाहीचा बळी नको

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण मागच्या 3 महिन्यांपासून राज्यभरात गाजत आहे. या हत्येमुळे बीडमधील राजकारण्यांनी पोसलेली गुंडगिरी, माफियाराज आणि दहशतीचा काळा चेहरा सर्वांसमोर आला. देशमुख यांच्या हत्येचा मास्टरमाईंड वाल्मिक कराडसह इतर आरोपींना पोलिसांनी गजाआड करत त्यांच्याविरोधात न्यायालयात आरोपपत्रही दाखल केले. केवळ संतोष आंधळे नावाचा आरोपीच तेवढा पोलिसांना गुंगारा देतोय. आंधळे जिवंत आहे की त्याचीही हत्या झाली, अशा शंकाकुशंकाही अधूनमधून उपस्थित होत असतात, परंतु बीडच्या केज न्यायालयात आता या प्रकरणाच्या खटल्याला सुरूवात झाली हेही नसे थोडके. वाल्मिक कराडला अटक झाल्यापासून बीडमधील गुंडगिरीचे एक ना अनेक व्हिडीओ समोर येताहेत. त्यापैकी खोक्या उर्फ सतीश भोसले नावाच्या गावगुंडाच्या व्हिडीओने मागील काही दिवसांपासून सोशल मीडियात धुमाकूळ घातलाय. या व्हिडीओत सतीश भोसले शिरूरमधील ढाकणे पितापुत्राला मारहाण करताना दिसतोय. खोक्या हा वाल्मिक कराडविरोधात आघाडी उघडलेल्या आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता मानला जातो. त्यामुळे धस अडचणीत आले आहेत. मागच्या काही वर्षांपासून खोक्याची शिरूरमध्ये दहशत आहे. आमदार सुरेश धसांसोबतची जवळीक सांगणारे त्याचे अनेक फोटो सार्वजनिक झालेत. बीडमधील वाल्मिक कराडच्या गुंडगिरीवरून राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधणारे सुरेश धस यांची या खोक्याच्या कारनाम्यांमुळे गोची झाली आहे. या खोक्याला म्हणे हरीण आणि मोरांच्या शिकारीचा भारी शौक होता. खोक्याने आतापर्यंत साधारण २०० हून अधिक हरणांना मारल्याचे, डोंगरात वागूर म्हणजेच पक्षी पकडण्याचे जाळे लावून कित्येक मोरही खाल्ल्याचे आजूबाजूच्या गावातील स्थानिक सांगतात. यातील हरीण आणि मोराचे मांस सुरेश धसांच्या घरीही पोचते झाल्याचा धसांच्या राजकीय विरोधकांचा आरोप आहे. वन्यप्राण्यांचे खाल्लेले मांस भलेही त्यांना पचले असेल, मात्र केलेली दृष्कृत्ये पचणे अवघड असते. कधी ना कधी ती बाहेर येणारच. काही दिवसांपूर्वी खोक्या त्याचा सहकारी दिलीप ढाकणे याच्या शेतात हरीण पकडत असताना ढाकणेंनी त्याला मज्जाव केला. तेव्हा खोक्या आणि त्याच्या गुंडांनी ढाकणे पितापुत्राला अमानुष मारहाण केली. या मारहाणीत दिलीप ढाकणेचा जबडा फ्रॅक्चर झाला असून त्याच्या मुलाचा पाय फ्रॅक्चर झाला. कधी नोटांची बंडले उडवून तर कधी कुणाला मारहाण करतानाच्या रिल्स बनवर्णाया खोक्याची शिरूरमध्ये प्रचंड दहशत असल्याचे म्हणतात, परंतु मागील काही वर्षांमध्ये या खोक्याने हरीण, काळवीट, ससे, मोर आणि शेकडो वन्य जीवांची शिकार केल्याचा आरोप वन्यजीवप्रेमींनी करूनही वनखाते आणि पोलीसही झोपा काढत होते. व्हायरल व्हिडीओने दोन्ही विभागांच्या इभ्रतीचे धिंडवडे निघाले तेव्हा कुठे वरिष्ठ पातळीवरून कारवाईचे आदेश आले. वन विभागाने खोक्याच्या घरावर छापेमारी केली तेव्हा तिथे त्यांना शिकारीचे सामान आणि जनावरांचे मांस आढळून आले. खोक्याच्या नावावर वन्य प्राण्यांची शिकार, त्यांच्या मांसाची तस्करी यासह अन्य २० गुन्हे दाखल असूनही त्याच्यावर कारवाई होत नव्हती. खोक्याच्या गुंडगिरीला चाप लावण्याऐवजी पोलिसांनी ढाकणे पितापुत्रासह इतर दोघांविरोधात ॲट्रॉसिटी ॲक्ट तसेच पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केल्याचे समजते. एखाद्या गावगुंडाला राजकीय अभय असल्याशिवाय तो इतका उन्माद करूच शकत नाही. असा राजकीय अभय खोक्यासारख्या गावगुंडांना स्थानिक लोकप्रतिनिधींकडूनच मिळत असतो. धनंजय मुंडेंवर आरोप करताना आपण धुतल्या तांदळासारखे आहोत, असा सुरेश धसांचा गैरसमज झाला असावा. फरार झालेल्या खोक्याला पोलिसांनी उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथे जाऊन पकडले. त्याच्या चौकशीतून यशावकाश बंयाचशा गोष्टी बाहेर येतीलच, मात्र खोक्याला बीडमध्ये आणण्याआधीच वन विभागाने त्याच्या घरावर बुलडोझर फिरवला. यानंतर काही गावगुंडांनी त्याच्या घरावर हल्ला करून संपूर्ण घरच पेटवून दिले. जाळपोळीत घरातील महिला, लहान मुलींवरही अत्याचार झाल्याचा आरोप होत आहे. धस यांच्या राजकीय विरोधकांचे हे काम असल्याचे म्हटले जाते, तर दुसरीकडे खोक्या पारधी समाजातील असल्यानेच त्याच्यावर कारवाई होत असल्याचा दावा करत या प्रकरणाला जातीय रंग देण्याचे कामही सुरू आहे. बुलडोझर कारवाईनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खोक्या असो, बोक्या असो की ठोक्या, सर्वांना ठोकणार, अशी प्रतिक्रिया दिली. ही प्रतिक्रिया उत्तर प्रदेशात गुन्हेगारांच्या घरावर बेकायदेशीरपणे बुलडोझर चालवणारे योगी आदित्यनाथ यांच्या वाटेने जाणारी आहे. अशा बेकायदेशीर बुलडोझर कारवाईवरून सर्वोच्च न्यायालयाने योगी सरकारची कानउघडणी केली होती. खोक्या उर्फ सतीश भोसलेने गुन्हा केलेला असल्याने त्याच्यावर कायद्याने कारवाई होणे गरजेचेच आहे, परंतु त्याचे घरदार जाळणे, कुटुंबातील सदस्यांवर हल्ला करणे हादेखील गुन्हाच ठरतो. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वात आधी गुंडगिरी पोसर्णाया आपल्या सरकारमधील आमदारांची कानउघडणी करावी आणि खोक्याच्या कुटुंबावर हल्ला करर्णायांना शासन करावे. कारण राज्यात सध्याच्या घडीला ठोकशाही किंवा बुलडोझरगिरीपेक्षा कायदा-सुव्यवस्था राखण्याची तातडीची गरज आहे. ठोकशाहीत लोकशाहीचा बळी जाता कामा नये.

महाराष्ट्रात डिजिटल विद्यापीठ हवे, पण...

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे डिजिटल विद्यापीठात रूपांतर करण्याचे राज्य सरकारने ठरवले आहे, असे समजते आहे. वास्तविक या विद्यापीठाला तंत्रशिक्षणासंदभार्तील कोणताही अभ्यासक्रम घेण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाची मनाई आहे. दुसरीकडे राज्यात इतर विद्यापीठे ऑनलाइन पद्धतीने अभ्यासक्रम राबवू शकतात. अ ायआयटीसारख्या संस्था आहेत. असे असताना हा निर्णय का घेतला जात आहे या आणि त्यानिमित्त उपस्थित होणाऱ्या इतर काही प्रश्नांची चर्चा...



सध्या उच्च शिक्षणात जागतिक पातळीवर अभूतपूर्व वेगाने बदल होताना दिसत आहेत, हे मुख्यत्वे विद्यार्थ्यांच्या आणि जागतिक कार्यबलाच्या सतत बदलत्या गरजांशी जुळवून घेण्यासाठी होत आहे. त्यात आता डिजिटल विद्यापीठाचा उदय होत आहे. डिजिटल विद्यापीठ ही एक अशी शैक्षणिक संस्था आहे जी जीवनाच्या सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना लवचीक, सुलभ आणि उच्च गुणवत्तेचे शिक्षण देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करते. अशी विद्यापीठे इंटरनेट आणि त्याआधारित तंत्रज्ञानाद्वारे विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन अभ्यासक्रम प्रामुख्याने प्रदान करतात. काही डिजिटल विद्यापीठे अनेकदा ऑनलाइन आणि प्रत्यक्ष शिक्षण अशा दोन्ही पद्धतीने विद्यार्थ्यांना अध्यापन करतात. अशी विद्यापीठे विद्यार्थ्यांना जगभरातील शिक्षकांकडून शिकण्याची संधी देतात ज्यामुळे वैविध्यपूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षण वातावरण निर्माण होते. ही विद्यापीठे आजीवन शिक्षणाच्या संस्कृतीला प्रोत्साहन देतात आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या कारकीर्दीत त्यांची कौशल्य व ज्ञान सतत विकसित करण्यात प्रोत्साहित करतात.

भारतात, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (२०२०) अनेक शैक्षणिक सुधारणा सुचवल्या आहेत; त्यात विद्यार्थ्यांना त्यांच्या दाराशी वैयक्तिकृत (पर्सनलाइज्ड) अनुभवांसह जागतिक दर्जाचे सार्वत्रिक शिक्षण प्रदान करणे, हीदेखील शैक्षणिक सुधारणा सुचविली आहे. त्यासाठी डिजिटल विद्यापीठाची स्थापना करणे हे जरुरीचे ठरते. त्या दृष्टीने भारतात 'नॅशनल डिजिटल विद्यापीठ' या पहिल्या डिजिटल विद्यापीठाची सुरुवात झाली. 'केरळ युनिव्हर्सिटी ऑफ डिजिटल सायन्सेस इनोव्हेशन ॲण्ड टेक्नॉलॉजी' हे भारतातील पहिले डिजिटल विद्यापीठ केरळ सरकारने २०२० मध्ये सुरूही केले. विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानव्य शास्त्रातील संशोधन आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करून देशातील ज्ञान क्रांतीचे प्रमुख प्रेरक बनणे हे या विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्रातही विद्यार्थ्यांना लवचीक, आकर्षक व दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याचे योजिले आहे. आज इंटरनेट, स्मार्टफोन व इतर डिजिटल उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे ऑनलाइन शिक्षण देणे अधिक सुलभ झाले आहे हे खरे, तसेच विद्यार्थ्यांना लवचीक शिक्षण पर्यायाची गरज भासत आहे हेही खरेच. ही डिजिटल विद्यापीठे कधीही व कुठेही अभ्यास करण्याची लवचीकता प्रदान करतात; त्यामुळे काम करणाऱ्या व्यावसायिकांना किंवा पालकांना, गृहिणींना आणि दुर्गम भागात राहणाऱ्यांनाही शिक्षण घेणे सुलभ होऊ शकते. पारंपरिक विद्यापीठांतील शैक्षणिक शुल्कापेक्षा स्वस्त आणि परवडणारे शैक्षणिक कार्यक्रम ही विद्यापीठे देऊ शकतात.

परंतु, डिजिटल विद्यापीठाबद्दल काही प्रश्न उपस्थित होत आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने ऑफलाइन व ऑनलाइन या दोन्ही प्रकारच्या पदवींना समान महत्त्व दिले तरी ऑनलाइन पदवी ही नियमित पदवीइतकीच उपयुक्त ठरणार आहे का? डिजिटल विद्यापीठाची पदवी प्राप्त करणाऱ्यांना कंपन्या किंवा अन्य प्रकारचे नियोक्ते नोकरी प्रदान करणार आहेत का? पारंपरिक शिक्षणात वर्गात विद्यार्थी व शिक्षकांची सुसंवाद व क्रियाकलाप, हे अध्यापन किंवा अध्ययन, ऑनलाइन शिक्षण पद्धतीपेक्षा अधिक प्रभावी करतात. तसेच विद्यापीठ अनुदान आयोग उच्च शिक्षणात, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तराचे प्रमाण १:२० वर असावे यासाठी आग्रही असताना ऑनलाइन पद्धतीत अमर्याद विद्यार्थी राहू शकतात, त्यामुळे विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष देणे कितपत शक्य होईल, याबाबतही शंका उपस्थित होते. तसेच दुर्गम भागात खराब इंटरनेट कनेक्टिव्हिटी हेदेखील डिजिटल विद्यापीठासाठी मोठे आव्हान ठरू शकते.

विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे 'मुक्त आणि दूरस्थ शिक्षण कार्यक्रम आणि ऑनलाइन कार्यक्रमा'ची नियमावली, दि. ४ सप्टेंबर २०२० रोजी अधिसूचित करण्यात आलेली आहे. या नियमांनुसार, 'उच्च शिक्षण संस्था म्हणजे प्रामुख्याने विद्यापीठेदेखील ; दूरस्थ शिक्षण/किंवा ऑनलाइन शैक्षणिक कार्यक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देऊ शकतात, जर ते समान शैक्षणिक कार्यक्रम पारंपरिक/दूरस्थ शिक्षण मोडमध्ये चालवत असतील, आणि तेथून एक बॅच उत्तीर्ण झाली असेल.' याचा अर्थ असा की, राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे ऑनलाइन पद्धतीने पदवी कार्यक्रम राबवून शकतात. तर आता असाही प्रश्न निर्माण होऊ शकतो की मग नव्याने डिजिटल विद्यापीठ कशाला?

महाराष्ट्र शासनाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे डिजिटल विद्यापीठात रूपांतर करण्याचे योजिले आहे, असे समजते. डिजिटल विद्यापीठाअंतर्गत विद्यार्थ्यांना उत्तम आणि चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील सर्व प्राध्यापकांना अध्यापनासाठी उच्च दर्जाचे ऑनलाइन प्रशिक्षण देण्याचा सरकारचा मानस आहे. या प्रशिक्षणामुळे ऑनलाइन वर्गातून विद्यार्थ्यांना प्रत्येक विषय सहज व सोप्या पद्धतीने शिकवणे प्राध्यापकांसाठी सहज शक्य होणार आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य सहज उपलब्ध व्हावे यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील सर्व पारंपरिक अभ्यासक्रमांचे रूपांतर संवादात्मक डिजिटल स्वरूपात करून देण्यात येणार आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला अभियांत्रिकी, स्थापत्यशास्त्र व तंत्रशिक्षणसंबंधीचे सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम घेण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाने मनाई केली आहे. आज या मुक्त विद्यापीठात ६८ शिक्षकांची पदे मंजूर आहेत, त्यापैकी आठ पदे ही विभागीय संचालकांसाठी राखीव आहेत. सद्या परिस्थितीत, विद्यापीठात काम करणाऱ्या मंजूर ६० शिक्षकांच्या पदांपैकी फक्त १९ जण कार्यरत आहेत व बाकीची ४१ पदे, म्हणजे ६८ टक्के पदे रिक्त आहेत. तसेच येथे मानव्य विद्या, वाणिज्य आणि व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, कृषी इत्यादी विद्याशाखांचे शिक्षक असल्याने यापैकी किती तंत्रस्नेही आहेत व ते डिजिटल विद्यापीठाच्या अनुषंगाने कितपत उपयुक्त ठरतील हा प्रश्नही येथे रास्त ठरतो.

भारतातील पहिले डिजिटल विद्यापीठ हे केरळ सरकारने तेथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट'मध्ये बदल घडवून स्थापन केले. त्यात २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात एम.एस्सी., एम.टेक., एम.बी.ए. आणि पीजी डिप्लोमा प्रोग्रामच सुरू केले आहेत. याचाच अर्थ की केरळ राज्याने डिजिटल विद्यापीठ हे मुळातच अद्यायावत तंत्रज्ञानाने विकसित असलेल्या विद्यापीठात सुरू केले. त्यामुळे महाराष्ट्रात डिजिटल विद्यापीठ सुरू करायचेच असेल, तर ते मुक्त विद्यापीठात सुरू न करता आय.आय.टी. आय. आय. आय.टी. किंवा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अथवा मुंबई विद्यापीठात का सुरू करू नये?

भारत सरकारच्या 'अमृत काल' ध्येयाला सक्रियपणे पाठिंबा देण्यासाठी महाराष्ट्र राज्याने डिजिटल विद्यापीठाची स्थापना करावी, परंतु ती प्रतिष्ठित असलेल्या, अद्यायावत तंत्रज्ञानाने विकसित अशा विद्यापीठात व्हावी; जेणेकरून महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यार्थ्याला कधीही आणि कुठेही दर्जेदार शिक्षण सुलभरीत्या उपलब्ध होईल. ज्याचा सर्वाधिक फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होईल तसेच महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना रोजगारासाठी आवश्यक असलेले कौशल्य प्रशिक्षणही देणे सुलभ होईल.

विद्यार्थ्यांचे ज्ञानमूल्य वाढत जायला हवे...

शिक्षणातील मूल्यांकनाची ही गुंतागुंत समजून घेऊन, एकत्रित प्रयत्नांनी आपण निश्चितच एक सक्षम आणि गुणवत्तेवर आधारित शिक्षण व्यवस्था निर्माण करू शकतो.

आजकाल शिक्षण क्षेत्रात परीक्षांचं स्वरूप कसं असावं, याबद्दल खूप चर्चा होते. दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी ऑनलाईन मीटिंग आणि सेंटर बदलण्याची सूचनांबद्दल कलह निर्माण झाला. या उपाययोजना फक्त खालच्या वर्गांसाठीच पुरेशा नाहीत. आपण याच गोष्टी पदवी आणि उच्च शिक्षणासाठी लागू केल्या, तर काय होईल? खरंच, अशी परिस्थिती आहे का? आणि जर असेल, तर त्याचे परिणाम काय असतील, हे प्रश्न आपल्यासमोर आहेत.

विद्यार्थी कॉलेजमधून पदवी घेऊन बाहेर पडतो, तेव्हा त्या पदवीला समाजात आणि बाजारात एक किंमत असते. पण ही किंमत ठरवतं कोण? लोक म्हणतात, पदवीचं खरं मूल्य विद्यार्थ्यांच्या ज्ञानात आहे. म्हणजे, समाजात वावरताना तो विद्यार्थी आपल्या ज्ञानाचा किती उपयोग करून दाखवतो, यावरच त्याच्या पदवीची खरी किंमत ठरते. हे अगदी खरं आहे.

आता प्रश्न असा आहे की, कॉलेज आणि विद्यापीठ आपल्याला पदवी देतात, पण या पदवीचं समाजात होणारं मूल्यांकन योग्य आहे का? महाविद्यालयं किंवा विद्यापीठं बाजारात होणारं मूल्यांकन पुरेसं नाही, असं म्हणू शकतात का? हा एक मोठा प्रश्न आहे. कारण, विद्यापीठाची प्रतिष्ठा आणि गुणवत्ता तर पदवीच्या माध्यमातूनच दिसते. विद्यार्थ्यांमध्ये किती ज्ञान 'जिरलं' आहे, हे विद्यापीठाला आणि कॉलेजला माहीत असणं खूप महत्त्वाचं आहे. प्राध्यापकांना हे बऱ्याच अंशी व्यक्तिशः माहीत असतंही, पण बाजारात आणि विद्यापीठाच्या मूल्यांकनात जर खूप फरक असेल, तर चूक कोणाची? कंपनीची, समाजाची, प्राध्यापकांची, कॉलेजची, विद्यापीठाची, यंत्रणेची, व्यवस्थेची, समाजाच्या त्या 'सध्याच्या' मानसिकतेची, की मग हतबल झालेल्या प्राध्यापकांची? या प्रश्नांची उत्तरं शोधायला हवीत.

विविध शाळा व महाविद्यालयातील दहावी-बारावीमध्ये जसे एकाच गुणांच्या श्रेणीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात खूप फरक दिसतो, तसंच पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्येही दिसतो. याबद्दल समाज आणि बाजार काय विचार करतात? यासंदर्भात कॉलेज आणि विद्यापीठांबद्दल लोकांची मतं काय आहेत? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांना पदवी दिल्यानंतर ज्ञान देणाऱ्या संस्थांचं स्वतःचं मूल्य समाजात आणि बाजारात बदलता येत नाही, हे खरं आहे. म्हणजे, कॉलेज आणि विद्यापीठाशी जोडलेल्या सगळ्या लोकांचं मूल्य पदवी दिल्यानंतर बदलत नाही. म्हणून, असं वाटतं की जिथे विद्यार्थी प्रत्यक्ष शिक्षण घेतो, त्या कॉलेजमध्ये प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या आधारावर प्रत्येक विषयाला फक्त ग्रेड (ए टू झेड, फर्स्ट टू सिक्स्थ) द्यावी (फक्त ज्ञानावर आधारित ग्रेड, गुण नकोत). आणि फार पूर्वी जशी अंतर्गत परीक्षा नसायची, तशी ती नसावी. म्हणजे महाविद्यालय विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयात काय काय करून घेते हे ते महाविद्यालयावर अवलंबून असेल. पण विद्यापीठाने मात्र पदवीतील प्रत्येक विषयाची १०० गुणांची वार्षिक परीक्षा घ्यावी. विद्यापीठाची परीक्षा ही एका कॉलेजच्या विद्यार्थ्यांची परीक्षा दुसऱ्या कॉलेजमध्ये, झूम मीटिंगच्या, सीसीटीव्ही किंवा इतर डिजिटल तंत्रज्ञानाच्या देखरेखेखाली व्हावी. असं केलं, तर कॉलेजने दिलेली ग्रेड आणि विद्यापीठाच्या परीक्षेत मिळालेले गुण, यातला फरक आपल्या लक्षात येईल. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, विद्यापीठाच्या नावाने दिली जाणारी पदवी खरंच किती 'किंमती' आहे, याचं वस्तुनिष्ठ मूल्यमापन विद्यापीठाला स्वतःला करता येईल व महाविद्यालयास देखील प्रत्येक विद्यार्थ्याच्या संबंधित स्वतःचे मूल्य समजेल.

आणि हो, अंतिम गुणपत्रिकेवर दोन्ही ग्रेड्स स्वतंत्रपणे नमूद केल्या पाहिजेत झ्र विद्यापीठाच्या परीक्षेतील गुणांच्या आधारात वरील ग्रेड आणि कॉलेजने विद्यार्थ्याच्या प्रत्येक विषयातील ज्ञानावर आधारित दिलेली ग्रेड. यामुळे कॉलेजने विद्यार्थ्यांमध्ये किती ह्यमूल्यह्न निर्माण केले, याची जबाबदारी आणि विद्यापीठाने स्वतंत्रपणे परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांचं मूल्य किती तपासलं, याची नोंद गुणपत्रिकेवर राहील. यामुळे समाज आणि बाजाराला कॉलेज आणि विद्यापीठ यांनी ज्ञानाचं मूल्य विद्यार्थ्यांमध्ये किती रुजवलं आहे, हे स्पष्टपणे कळेल.

आता पुढचा विचार असा की, विद्यार्थ्याला बाजारात किंवा समाजात आपल्या ज्ञानाची किंमत ठरवायची आहे. त्याआधी, आपलं ज्ञान राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या ज्ञानाच्या तुलनेत कुठे आहे, हे तपासण्यासाठी विद्यार्थ्यांनी खासगी किंवा सरकारी संस्थांच्या परीक्षा द्याव्यात. हे ऐच्छिक असावं, सक्तीचं नको. असं केल्यावर, विद्यार्थी जेव्हा समाजात आणि बाजारात आपल्या ज्ञानाची किंमत ठरवायला जाईल, तेव्हा तो अधिक जागरूक असेल. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या बाजारात आपल्या ज्ञानाची किंमत ठरवताना तो अधिक व्यवहारी आणि सुज्ञ सजगपणे वाटाघाटी करू शकेल.

या सर्व विचारांचा एकत्रितपणे विचार केल्यास, यात महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडण्याची मोठी शक्यता आहे. नवीन परीक्षा पद्धती आणि मूल्यांकनाच्या दिशेने उचललेले हे पाऊल, शिक्षण अधिक विद्यार्थी-केंद्रित आणि बाजाराभिमुख बनवेल. दुहेरी ग्रेडिंग प्रणालीसारख्या उपायांमुळे पदवीच्या मूल्यांकनातील त्रुटी कमी होतील आणि ज्ञानाला खऱ्या अर्थाने महत्त्व मिळेल. प्रश्न हा आहे की, आपण ज्ञानाला किती गांभीर्याने घेतो? आणि आपली शिक्षण प्रणाली हे महत्त्व समाजात, बाजारात जिथे शिक्षण व्यवस्थेसह सगळ्यांचे 'मूल्य' होते तेथे योग्य प्रकारे पोहोचवू शकेल का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आणि त्यानुसार कृती करणे, हे आता आवश्यक आहे. शिक्षणातील मूल्यांकनाची ही गुंतागुंत समजून घेऊन, एकत्रित प्रयत्नांनी आपण निश्चितच एक सक्षम आणि गुणवत्तेवर आधारित शिक्षण व्यवस्था निर्माण करू शकतो. या बदलांच्या अंमलबजावणीतून, महाराष्ट्रातील शिक्षण एका नव्या उंचीवर पोहोचेल, आणि विद्यार्थ्यांच्या ज्ञानात, कौशल्यात वाढ होऊन ते खऱ्या जगासाठी तयार होतील, यात शंका नाही कारण विद्यार्थी स्वतःचे स्वमूल्य अधिक सुज्ञपणे सजगतेने जाणतील.

शेतकऱ्यांना जगवण्याच्या सरकारी धोरणाची गरज

सर्वसामान्यांचे सरकार, शेतकऱ्यांचे सरकार अशा रोज बढाया मारणाऱ्या सरकारची पोलखोल एका शेतकऱ्याने केली आहे. दुर्दैवाने ही पोलखोल करताना मात्र, त्यांनी आयुष्याची अखेर केली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील कैलास नागरे या शेतकऱ्याने ऐन होळीच्या दिवशी आत्महत्या केली. विशेष म्हणजे राज्यात रोज ८ शेतकरी आत्महत्या करत आहेत, अशी कबुली चार दिवसांपूर्वी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी विधिमंडळात दिली होती. आता सरकार यातून काही बोध घेणार का, हाच खरा प्रश्न आहे.

कैलास अर्जुन नागरे. वय-४४, व्यवसाय-शेतकरी, गाव-शिवनी आरमाळ, तालुका-देऊळगाव राजा, जिल्हा-बुलढाणा. राज्यात गुरुवारी सर्वत्र होळीचा उत्साह होता, सर्वजण वाईटाची, दुर्गुणांची होळी करत होते. त्यावेळी याच कैलास नागरे या शेतकर्याने त्याच्या आयुष्याची होळी केली. शेतीसाठी पाणी मिळत नाही म्हणून पत्नी, तीन मुलं आणि आईवडिलांना मागे ठेऊन त्यांनी आत्महत्या केली. गावात सिंचनाच्या सुविधा असूनही गावातील शेतीला पाणी का मिळत नाही, याविरोधात कैलास नागरे त्यांचा लढा सुरू होता. बुलढाणा जिल्ह्यातील अंढेरा मंडळातील लघु प्रकल्पात खडकपूर्णा धरणाचे पाणी कालव्याने सोडावे, ही त्यांची मागणी होती. विशेष म्हणजे याच कैलास नागरे यांना ऑक्टोबर २०२४ मध्ये युवा शेतकरी पुरस्काराने राज्य सरकारने सन्मानित केले होते. २०२० मध्ये जाहीर झालेला पुरस्कार कोरोनामुळे प्रदान करता आला नव्हता. अशा या प्रयोगशील शेतकऱ्याने आत्महत्या करावी, यासारखे राज्याचे दुर्दैव ते कोणते?

याला योगायोग म्हणावे की दुर्दैव हे ज्याचे त्याने ठरवावे. ११ मार्च रोजी विधान परिषदेत आमदार शिवाजीराव गर्जे यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न विचारला होता. त्यावर ५६ महिन्यांपासून राज्यात रोज सरासरी ८ शेतकरी आत्महत्या करत असल्याची कबुली राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली होती. त्यानंतर दोनच दिवसांत कैलास नागरे यांनी आत्महत्या केली. एकनाथ शिंदे यांनी ३० जून २०२२ रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर महाराष्ट्र शेतकरी आत्महत्यामुक्त करण्याची घोषणा केली. तेव्हापासून ३१ जानेवारी २०२५ पर्यंत १७०० हून अधिक शेतकऱ्यांनी आयुष्य संपवले. हे आहे राज्यातील शेतकरी आत्महत्येचे वास्तव! आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आहेत. शेतकरी आत्महत्या हा कालचा, आजचा प्रश्न नाही. मुळात शेतकरी आत्महत्या का करतात, या कारणाच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे. राज्यातील विविध प्रांतातील शेतकऱ्यांच्या मागण्या काय आहेत, याचा गांभीर्याने आणि धोरणात्मक विचार व्हायला हवा. त्याऐवजी जाईल तिथे हे शेतकऱ्यांचे सरकार आहे, अशा उगाचच बढाया मारण्यात काही अर्थ आहे का, याचा विचार व्हायला हवा.

कैलास नागरे यांच्या सुसाईड नोटमधील सर्वात महत्त्वाची ओळ होती, 'राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आमदार, खासदारसाहेब ही शेती आहुती मागतेय. कृपया पंचक्रोशीत पाण्याची हमी द्या!' या मागणीसाठी कैलास नागरे हा युवा शेतकरी लढत होता. डिसेंबर २०२४ मध्ये कैलास नागरे यांनी गावातील शेतांना पाणी मिळावे यासाठी ७ दिवस उपोषण केले होते. प्रशासनाच्या आश्वासनावर विश्वास ठेवून त्यांनी उपोषण सोडले होते. त्यानंतर महिना झाला पण प्रशासन ढिम्मच होते. आश्वासनपूर्तीचे नाव घेत नव्हते. त्यामुळे नागरे यांनी २६ जानेवारी रोजी पुन्हा आंदोलनाला बसण्याचा इशारा दिला होता. त्यावेळी पालकमंत्री मकरंद जाधव यांनी आश्वासन दिले. अखेर पालकमंत्र्यावर विश्वास ठेवत नागरे यांनी उपोषण स्थगित केले. मात्र, आश्वासन देऊन पुन्हा दीड महिना उलटला तरी सरकार काहीच भूमिका घेत नव्हते. अखेरीस १३ मार्च रोजी कैलास नागरे यांनी आयुष्याची अखेर केली. तत्पूर्वी चार पानी सुसाईड नोट लिहून ठेवली होती. यात त्यांनी सरकारच्या उदासीन धोरणाबाबत खंत व्यक्त केली होती. नागरे यांच्या आत्महत्येने महाराष्ट्रातील शेतकरी, जनता हळहळत आहे. त्याचवेळी सरकारचे आश्वासन किती पोकळ आहे, हे या निमित्ताने उघड झाले. त्यामुळे कैलास नागरे यांनी आत्महत्या केली म्हणायची की, त्यांना सरकारच्या उदासीन धोरणामुळे आत्महत्या करण्यास भाग पाडले, याचाही विचार व्हायला हवा.

राज्यात शेतकरी आत्महत्या करत आहेत, याचाच अर्थ राज्याचे शेतीविषयक धोरण शेतकरीपूरक नाही. आजार समजला तर योग्य उपचार करता येतात. शेतकऱ्यांबाबत आजपर्यंत आजाराचे निदान होऊ शकले नाही, ही किती गंभीर आणि दुर्दैवाची बाब आहे. सर्वांचा पोशिंदा असलेल्या २ हजार ७०६ शेतकऱ्यांनी २०२४ मध्ये आयुष्य संपवले. यातील सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या अमरावती विभागातील आहेत. या विभागात तब्बल १ हजार ६९ शेतकऱ्यांनी जीवन संपवले. त्या खालोखाल छत्रपती संभाजीनगरात ९२५ शेतकऱ्यांनी आयुष्य संपवले. अमरावती विभागात गेल्या २४ वर्षांत ९ हजार ९६१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. म्हणजेच विभागवार नैसर्गिक आपत्ती वेगळ्या आहेत, शेतकऱ्यांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत. सध्या नाही म्हणायला प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतून शेतकऱ्यांना ६ हजार रुपये तसेच नमो शेतकरी महासन्मान निधीतून ६ हजार रुपये (एकूण १२ हजार) वार्षिक दिले जात आहेत. मात्र, ही शेतकऱ्यांची मागणी होती का? शेतकऱ्यांच्या मूळ आजारावर उपचार करण्याऐवजी थातूरमातूर उपचार केल्यासारखे काही पैसे दिले की आपण मोठे कर्तव्य केले याचा धिंडोरा पिटायला मोकळे, असे झाले आहे.

कधी प्रमाणाबाहेर कोसळलेला पाऊस तर कधी अवकाळी पावसाची विनाकारण शिक्षा, कधी वरुणराजाच्या वक्रदृष्टीमुळे सुका दुष्काळ या आपत्ती कायम शेतकऱ्यांच्या नशिबी येत असतात. अनेकदा कोसळलेल्या भावामुळे शेतकऱ्यांच्या हाताशी फार काही लागत नाही. अशातच खतांना मिळणारे कमी अनुदान आणि बी-बियाणांच्या चढ्या किमती यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. शेतीचे आर्थिक गणित बिघडले आहे. यातील नैसर्गिक आपत्ती सोडली तर इतर संकटे ही मनुष्यनि

चटपटीत मसाला पाव

साहित्य- अमूल बटर अर्धी वाटी, दोन मध्यम कांदे बारीक चिरून, दोन मध्यम टोमॅटो बारीक चिरून, दोन टेबलस्पून बारीक चिरलेली हिरवी मिरची, एक टेबलस्पून आलं-लसूण पेस्ट, पाव वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, दोन चमचे पाव भाजीचा मसाला, पावभाजीचे पाव, एक चमचा लाल मिरचीचे तिखट, एक चमचा लिंबाचा रस, चवीनुसार मीठ.

कृती- तव्यावर अमूल बटर घालून गरम करून घ्या व त्यात बारीक चिरलेला कांदा घालून तो मऊ होईपर्यंत परता. मग त्यात आलं-लसणाची पेस्ट घालून दोन मिनिटे परतून घ्या. नंतर पाव भाजीचा मसाला घालून पुन्हा दोन मिनिटे परता. आता त्यात बारीक चिरलेले टोमॅटो व लाल मिरचीचे तिखट घालून टोमॅटो मऊ होईपर्यंत परता. मग हिरव्या मिरच्यांचे बारीक चिरलेले तुकडे घालून ते कुरकुरीत होईपर्यंत परता आता पावाच्या दोन्ही बाजूला (बाहेरून आणि आतून) बटर लावून दोन्ही बाजू भाजून घ्या.

नंतर आतील बाजूला आपण तयार केलेला मसाला सगळीकडे पसरून लावा. मसाला लावलेला पाव तव्यावर ठेवून डावाने सारखा दाबत राहून हलका भाजून घ्या. याच पद्धतीने सगळे पाव मसाल्याचे तयार करून घ्या. गरम मसाला पाव पुदिन्याच्या चटणी सोबत सर्व्ह करा.

चेहरा आरोग्याचा आरसा

आपली त्वचा हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. त्यातल्या त्यात चेहऱ्याची त्वचा आपले आरोग्य कसे आहे हे दर्शवीत असते. जुन्या काळातील आयुर्वेदासारख्या सगळ्या जुन्या उपचार पध्दतींनी ही गोष्ट मान्य केलेली आहे. चीनमध्ये लोकप्रिय असलेल्या ऍक्युपंक्चर किंवा ऍक्युप्रेशर अशा जुन्या उपचार पध्दतीत सुध्दा चेहरा बघून आरोग्याचे निदान केले जाते.

आयुर्वेदामध्ये जशी नाडी परीक्षा आहे. तेवढी ही चेहऱ्याची परीक्षा शास्त्रशुध्द आणि नेमकी नाही. परंतु आरोग्याच्या काही तक्रारींचा अंदाज चेहऱ्याच्या त्वचेवरून येतो असे अनेक अनुभवी डॉक्टर आणि वैद्यांचे म्हणणे आहे. आपल्या शरीरातल्या अवयवांमध्ये जे काही घडते त्याची प्रतिक्रिया चेहऱ्यावर उमटते आणि चेहऱ्यावरून जे दिसते त्याचाच विस्तार शरीरातल्या अवयवांमध्ये झालेला असतो असे चिनी लोक मानतात.

आधुनिक काळातले त्वचारोग तज्ञ देखील त्वचेवरच्या विविध डागांवरून रुग्णाच्या कोणत्या अवयवात काय बदल झालेले आहेत हे हेरता येते असे मान्य करत आहेत. काही डॉक्टरांनी तर चेहऱ्यावरचा कोणता बदल शरीरातल्या कोणत्या दोषाचा द्योतक आहे याचे काही ठोकताळे बसवलेले आहेत. तोंडामध्ये होणारे बदल किंवा दिसणारे दोष हे पोटातल्या विकाराचे द्योतक असतात. अपचन झालेल्या रुग्णाच्या तोंडाला दुर्गंध येतो. पोटातल्या काही विकारांचे प्रतिबिंब तोंड येण्यात उमटत असते. मूत्रपिंड आणि मूत्राशय यात काही दोष असतील तर ते दोष हनुवटीवर उमटतात. त्याच बरोबर लिव्हरमध्ये काही दोष असेल तर पापण्यामध्ये बदल होतात. काही लोकांना या गोष्टी मान्य नाहीत परंतु शेवटी हे ठोकताळे आहेत.

काही लोकांच्या चेहऱ्यावर मानेच्या मागे त्वचा ङ्गिकट पडायला लागते तेव्हा काही विशिष्ट आजार बळावत असतात. काही लोकांच्या चेहऱ्यावरच्या काही बदलांतून अनेक डॉक्टरांना तो मधुमेहाला बळी पडण्याची शक्यता लक्षात येते. चेहऱ्यातले काही बदल विशेषतः कानाच्या मागचे बदल हे रुग्ण ज्यादा अन्न प्राशन करत असल्याचे द्योतक असते असे काही डॉक्टरांच्या लक्षात आले आहे.

सतत पैशाच्या मागे लागणारे लोक, दारू पिणारे लोक, रक्तदाब वाढलेले लोक चेहऱ्यावरून सरळ सरळ ओळखू येतात मात्र त्यासाठी अनुभवी नजर लागते.

पपई खाण्याचे १० आरोग्यदायी फायदे!

चवीला गोड, शरीराला पोषक आणि त्वचेचे आरोग्य सुधारणारे फळ म्हणजे पपई ! पपई शरीराला गरम असल्याने वातावरणात गारवा असताना खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाण्याचे आणखी दहा फायदेदेखील आहेत....

▮ शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करते- पपईमध्ये व्हिटामिन सी व फायबरचे प्रमाण अधिक असल्याने रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहण्यापासून बचाव होतो. रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहिल्याने हृद्यविकाराचा धोका संभवतो.

▮ वजन घटवण्यास मदत होते- एका मध्यम आकाराच्या पपईमध्ये 120 कॅलेरीज असतात. त्यामुळे जर तुम्ही वजन घटवण्याच्या विचारात असाल तर पपईचा आहारात नियमित समावेश करा. पपईतील डायटरी फायबर्समुळे वेळी-अवेळी लागणाऱ्या भूकेवर नियंत्रण मिळवणे शक्य होते.

▮ रोगप्रतिकारशक्ती वाढते- आजारांशी सक्षमतेने सामना करण्यासाठी तुमची रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणे फार गरजेचे आहे. तसेच शरीरातील व्हिटामिन सीच्या गरजेपेक्षा 200% अधिक व्हिटामिन सी केवळ पपईमुळे मिळू शकते.

▮ मधुमेहींसाठी गुणकारी- पपई चवीला गोड असली तरीही त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही. कपभर पपईच्या तुकड्यांमधून केवळ 8.3 ग्रॅम साखर असते. यामुळे मधुमेहींनी पपई खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाल्ल्याने मधुमेह जडण्यापासून बचाव होतो.

▮ डोळ्यांचे आरोग्य सुधारते- पपईमध्ये व्हिटमिन ए मुबलक प्रमाणात आढळते. डोळ्यांचे आरोग्य राखण्यासाठी व्हिटामिन ए अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या वयानुसार दृष्टी कमी होण्याची शक्यता असते. या समस्येपासून बचावण्यासाठी पपईचा आहारात समावेश करावा.

▮ सांधेदुखीपासून आराम मिळतो- पपईमध्ये व्हिटामिन सी प्रमाणेच वेदनाशामक गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या रुग्णांना पपईचे सेवन फारच हितकारी आहे. पपईतील व्हिटामीन सी घटक सांध्यांना मजबुती देण्यास तसेच सूज कमी करण्यास मदत करतात.

▮ पचन सुधारते- आजकालच्या व्यस्त जीवनशैलीमुळे जंक फूड किंवा बाहेरचे जेवण टाळणे हे काहीसे कठीण आहे. त्यामुळे अशा खाण्याने पचनशक्ती बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी पपई खाल्ल्याने अरबट-चरबट खाल्ल्याने होणारे दुष्परिणाम टाळण्यास मदत होते. पपईतील पपैन नामक एंजाईम पचन कार्य सुधारते.

▮ मासिक पाळीचा त्रास कमी होतो- अनियमित मासिक पाळी तसेच मासिक पाळीच्या काळातील त्रास अशा समस्या दूर करण्यासाठी पपई फारच उपयुक्त आहे.

▮ कर्करोगापासून बचाव होतो- पपईमधील ऍन्टीऑक्सिडंट घटक शरीरातील फ्री रॅडीकल्सपासून तुमचा बचाव करते. तसेच पपईतील बीटा कॅरोटीन आतड्यांच्या कर्करोगापासून बचाव करते.

▮ ताण-तणाव कमी होतो - दिवसभराच्या धावपळीनंतर वाटीभर पपईचे काप खाल्ल्यास थकवा कमी होण्यास मदत होते. तसेच व्हिटामिन सी शरीरातील हार्मोन्सचे प्रमाण संतुलित राखते.

आता डेस्कटॉपवरून करा व्हॉट्सऍप व्हिडिओ आणि ऑडियो कॉल

व्हॉट्सऍप कंपनी आपल्या यूजर्ससाठी नेहमीच नवीन फीचर्स आणते. आता कंपनी नवीन फीचर्स वर काम करीत आहे. व्हॉट्सऍप यूजर्सला आता डेस्कटॉपवरून सुद्धा कॉल करता येणार आहेत. या कॉलमध्ये ऑडियो आणि व्हिडिओचा समावेश असेल.

व्हॉट्सऍप ने डेस्कटॉपसाठी अनेक फीचर्स आणले आहेत. परंतु, दोन फीचर्सची कमतरता अजूनही जाणवत आहे. पहिले आहे डेस्कटॉप वर व्हॉट्सऍप कॉल करणे आणि दुसरे डेस्कटॉपवर व्हिडिओ किंवा किंवा ऑडियो करणे. यातील एका फीचरची कमतरता आता जाणवणार नाही. खरं म्हणजे व्हॉट्सऍप ने विंडोजसाठी एक नवीन ऍप आणला आहे. हा ऍप वेगाने लोड होते. तसेच सहज इंटरफेस सोबत येते. याच्या मदतीने व्हॉट्सऍप आपल्या यूजर्सला जास्तीत जास्त ८ लोकांसोबत ग्रुप व्हिडिओ कॉल आणि ३२ लोकांसोबत ऑडियो कॉल करण्याची सुविधा देते.

मैक ओएस ला ही सुविधा मिळणार

समोर आलेल्या माहितीनुसार, फक्त विंडोजचा यात समावेश करण्यात आला आहे. परंतु, हे फीचर मॅकबॅकच्या यूजर्ससाठी उपलब्ध केले जाणार आहे. कारण, सध्या मॅक डेस्कटॉप व्हर्जन बीटा टेस्टिंग मध्ये आहे. नुकत्याच एका ब्लॉग पोस्टमध्ये मेटाने म्हटले की, विंडोजच्या इंस्टेंट मेसेजिंग ऍप व्हॉट्सऍपला नवीन फीचर्स सोबत एक नवीन लूक मिळाले आहे. मेटाने म्हटले की, आम्ही विंडोजसाठी एक नवीन व्हॉट्सऍप ऍप आणले जात आहे. जे वेगाने लोड होईल. या ऍप सोबत मोबाइल व्हर्जनच्या सारखे इंटरफेस सोबत येईल.

डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप कॉल कसा कराल?

डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप च्या माध्यमातून व्हिडिओ किंवा ऑडियो कॉल करण्याची सुविधा अपडेट सोबत उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला डेस्कटॉप व्हॉट्सऍप ऍपला अपडेट करावे लागणार आहे. अपडेट करण्यात आल्यानंतर तुम्हाला मोबाइल इंटरफेस प्रमाणे व्हिडिओ कॉल आणि ऑडियो कॉलचे आयकॉन दिसेल.

पोळीला तूप लावून खाणे आरोग्यास लाभदायक

हेल्दी राहण्यासाठी शरीरास सकस आहाराची फार गरज असते. आताच्या काळात सर्वांना फास्ट फूड जास्त आवडतात, त्यामुळे रोजच्या आहाराकडे दुर्लक्ष होते. फास्ट फूड आणि तेलकट पदार्थ आरोग्यास घातक असतात. कित्येक लोक पोळ्या बनवण्यासाठी तेल किंवा डालड्याचा उपयोग करतात. तर पोळ्या बनवण्यासाठी तूपाचा वापर शरीरास अधिक लाभदायक आहे. तूपामध्ये अनेक प्रकारचे पोषक तत्वे असतात. तुम्हाला वाटत असेल, तूप खाल्याने वजन वाढतं तर हा एक गैरसमज आहे.

▮ वजन कमी करण्यासाठी तूपाची मदत होते.

▮ तूप आपल्या शरीरातील मेटाबॉलिज्म वाढवण्यास मदत करतो. त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

त्वचेसाठी लाभदायक तूप

तूपामध्ये एन्टीऑक्सीडेंट घटक असतात ते त्वचेसाठी फार फायदेशीर असतात. त्याचप्रमाणे त्वचेमध्ये असलेले डेड सेल्स तूपाच्या नियमित सेवनाने नष्ट होतात.

दातांच्या समस्येने देखील कर्करोग होण्याची शक्यता

कर्करोग (कॅन्सर) होण्याचे नवे कारण सध्या समोर आले आहे. देशातील कित्येक लोकांना दात साफ न केल्यामुळे तोंडाचा कर्करोग (कॅन्सर) झाल्याचे समोर आले आहे. अशी दिरंगाई करणाऱ्या लोकांच्या संख्येत ४ ते ५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. जे लोक कोणत्याही प्रकारच्या तंबाखूचे सेवन करत नाहीत, त्यांना सुद्धा कर्करोग (कॅन्सर) होण्याची शक्यता आहे. तुटलेल्या दातांच्या फटी योग्यरीत्या साफ न केल्यामुळे हा गंभीर त्रास उद्भवण्याची शक्यता आहे. अन्नाचे कण दातांमध्ये अडकतात आणि त्यानंतर ते कण कुजतात. कुजलेल्या कणांमुळे सुद्धा कर्करोग होऊ शकतो. मागील सहा वर्षांमध्ये भारतात ओठ आणि तोंडाचा कर्करोग असणाऱ्या रुग्णांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली आहे. या परिस्थितीला रोखण्यासाठी खराब दातांची स्वच्छता, तुटलेले दात याकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे.

काही उपाय

- तंबाखू खाणे टाळा. जर तंबाखू खात असाल तर वेळीच खाणे बंद करा.
- मद्याचे सेवन प्रमाणात करा.
- उन्हामध्ये फार काळ राहणे टाळा. उन्हात जाण्याआधी लिपबामचा वापर करा.
- फास्ट फूड खाणे टाळा किंवा प्रमाणात खा. आहात ताज्या फळांचा वापर करा.
- सतत तंबाखूची तल्लफ येत असल्यास, पायऱ्यांवरून चढ-उतार करा.

वर्किंग वुमन्सने आहारात 'या' पोषक वस्तूंचा समावेश केला पाहिजे

स्त्रियांनी आपल्या आहाराची विशेष काळजी घेयला हवी कारण की त्यांना ऑफिस आणि घरात दोन्हीकडे लक्ष द्यावं लागतं. स्त्रिया सर्वांच लक्ष ठेवण्याच्या नादात स्वतःची काळजी घेत नाही. म्हणून वर्किंग वूमन्सला आपल्या आहारात पोषक वस्तूंचा समावेश केला पाहिजे. येथे प्रस्तुत आहे वर्किंग वूमन्ससाठी डायट चार्टः

ब्रेकफास्ट : वर्किंग वुमन्सने ब्रेकफास्ट स्किप करायला नको. घरातून निघण्याआधी आपण दूध, सांजा, कॉर्नफ्लेक्स किंवा सँडविच घ्या. सकाळच्या नाश्त्यात व्हिंमिन ए युक्त फळे जशी शेवफळ, पपई आणि स्ट्रॉबेरी खाणे फायदेशीर ठरेल. याबरोबरच थोडेसे ड्रायफ्रुट्स आपल्याजवळ ठेवावे.

लंच : वर्किंग वुमन्सच्या ब्रेकफास्ट आणि लंच यात चार ते पाच तासांचा अंतर हवे. लंचमध्ये भाजी, डाळ, दही, भात आणि पोळीचा समावेश करा. हिरव्या भाज्या जसे ब्रोकोली, पालक, मेथी व इतर आहारात सामील करा. लंचमध्ये सॅलड किंवा कोशिंबीर घ्या.

स्नॅक्स : ऑफिसमध्ये काम करणारे काही लोक संध्याकाळी भूक लागल्यावर काही अनहेल्थी फूड खातात, जे आरोग्याच्या दृष्टीने योग्य नाही. संध्याकाळी भूक लागल्यावर फळे किंवा कडधान्य खाणे फायद्याचे ठरेल. याने भूकही भागेल आणि आरोग्यासाठी उत्तमही ठरेल.

डिनर : रात्रीचे जेवण झोपण्याच्या दोन ते तीन तासांपूर्वी घ्यायला हवे. याने अन्न पचायला वेळ मिळतो. रात्री जेवल्याशिवाय झोपू नये. डिनरमध्ये तेलकट पदार्थ खाऊ नयेत. डिनरमध्ये पोळी आणि कमी मसालेदार भाजी किंवा डाळ हवी. डिनरमध्ये घेतला जाणारा आहार लंचपेक्षा लाइट असायला हवा.

शायनी केसांसाठी

एक चमचा ॲप्पल साइडर व्हिनेगरमध्ये १० थेंब आवळ्याचे तेल मिसळा आणि यात एक चमचा मध आणि एक चमचा पाणी मिसळा. आता या मिश्रणाने शाम्पूनंतर पाच मिनिटापर्यंत आपल्या डोक्याचा मालीश करा आणि मग गार पाण्याने केस धुऊन घ्या.

हल्लीच्या जीवनशैलीत प्रत्येक जण लठ्ठपणामुळे त्रस्त आहे. वजन कमी करण्यासाठी कधी डायटिंग तर कधी व्यायाम तर कधी काय...तरी यश हाती लागत नसेल तर सर्वात मोठे कारण आहे की आपल्या डेली डायटमध्ये सामील अशा चार वस्तू ज्यामुळे आपल्या प्रयत्नांना यश मिळत नाहीये. जर या वस्तूंचे सेवन करताना आपण काळजी घेतली नाही तर परिणाम वाईट होऊ शकतात.

लठ्ठपणा कमी करण्यासाठी या चार पदार्थांपासून जरा लांबच राहा!

मीठ : आपण मिठाचे अधिक सेवन करत असाल तर हे आपल्या आरोग्यासाठी धोकादायक ठरेल. एका शोधाप्रमाणे एका दिवसात एक ग्रॅमहून अधिक मीठ सेवन केल्यास लठ्ठपणा वाढू शकतो. संतुलित प्रमाणापेक्षा अधिक मीठ खाणाऱ्यांचे वजन इतर लोकांपेक्षा अधिक असतं. तसेच पॅक्ड पदार्थांमध्ये मिठाचे प्रमाण अधिकच असतं.

साखर : गोड प्रत्येकाला आवडतं, परंतु अधिक प्रमाणात साखर नुकसान करते. कारण साखरेमुळे लठ्ठपणा जलद गतीने वाढतो आणि नंतर यावर नियंत्रण ठेवणं कठीण जातं. आपण दररोजच्या आहारात साखरेचे प्रमाण कमी करून वजन कमी करू शकता. चांगल्या आरोग्यासाठी पुरुषांनी दररोज ५० ग्रॅम आणि महिलांनी ७० ग्रॅमहून अधिक साखरेचे सेवन करू नये.

तांदूळ : आपण तांदूळ खाण्याचे शौकीन असाल तर लठ्ठपणा कमी करणे जरा अवघड आहे. पांढऱ्या तांदळात कार्बोहायड्रेटचे प्रमाण अधिक असल्यामुळे लठ्ठपणा वाढतो. वजन कमी करण्याची इच्छा असल्यास पांढऱ्याऐवजी ब्राऊन राईसचे सेवन करावे.

मैदा : मैदा आणि मैद्याचे खाद्यपदार्थ सेवन केल्याने लठ्ठपणा कधीच कमी होणार नाही. कारण मैद्यामुळे शरीरात ब्लड शुगर वेगाने वाढते, ज्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह आणि कर्करोग यासारखे आजार होण्याची शक्यता वाढते.

पाणी पिणाऱ्याची बुद्धी पाणीदार

पाणी प्यायल्यामुळे बुद्धी तेज होते आणि कोणत्याही माहितीचे आकलन पटकन होते, असे इंग्लंडमध्ये करण्यात आलेल्या एका प्रयोगात आढळले आहे. ईस्ट लंडन स्कूल ऑफ सायकॉलॉजी या संस्थेमध्ये पाणी आणि आकलन शक्ती यांच्या संबंधावर काही प्रयोग करण्यात आले, तेव्हा असे आढळले की माणूस पाणी पिऊन एखादे वाचन करतो तेव्हा त्याला वाचलेल्या मजकुराचे आकलन चांगले होते. याउलट एखाद्या व्यक्तीला भरपूर तहान लागलेली असताना सुद्धा प्यायला पाणी न देता वाचन करायला लावले तर किंवा एखादे काम करायला लावले तर ती व्यक्ती पाणी प्यायलेल्या व्यक्तीपेक्षा मंदपणे आकलन करते. या दृष्टीने या संस्थेने या लोकांवर प्रयोग केले आणि तहानलेल्या अवस्थेत त्यांना काही अवघड कामे सांगितली. तेव्हा त्यांना ती कामे व्यवस्थित समजली नाहीत. उलट भरपूर पाणी प्यायलेल्या लोकांना हीच कामे सांगितली तेव्हा त्यांना ती १४ टक्के जास्त वेगाने समजली.

यामागचे कारणे काय असावे, याचा छडा लावण्यात आला. तेव्हा असे आढळले की कोणत्याही गोष्टीचे आकलन होण्यासाठी आपल्या शरीरातील व्हॅसोप्रेसिन हे हार्मोन कार्यरत व्हावे लागते. कमी पाणी प्यायलेल्या अवस्थेत हे हार्मोन कार्यरत होत नाहीत आणि भरपूर पाणी प्यायल्यास ते कार्यरत होते.

रिकाम्या पोटी 'हे' पदार्थ खाणे टाळाच!

सकाळी उठल्या उठल्या काय खावे हा प्रश्न अनेकांना पडतो. भारतीयांमध्ये तर उठल्याबरोबर चहा घेणे ही जणू रीतच आहे. मात्र नुसता चहा घेणे आरोग्यासाठी घातक असल्याचे मागील काही काळापासून बोलले जात असल्याने त्यासोबत बिस्किटे, खारी, टोस्ट खाण्याचे प्रमाण वाढले. मात्र चहा-कॉफी दिवसाची सुरुवात करताना घेऊच नये, असे अनेक आहारतज्ज्ञ सांगताना दिसतात. त्यामागे काही महत्त्वपूर्ण कारणे नक्कीच आहेत. काही गोष्टी रिकाम्या पोटी खाल्ल्यास आरोग्याला दीर्घकालीन अपाय होऊ शकतात. त्यामुळे रिकाम्या पोटी कोणत्या गोष्टी खाणे किंवा पिणे टाळावे हे जाणून घेऊया...

चहा-कॉफी

सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी घेण्याची सवय अनेकांना असते. हे योग्य नाही, हे माहीत असूनही केवळ लहानपणापासूनची सवय म्हणून किंवा कुटुंबातून चालत आलेली परंपरा म्हणून ते चालूच ठेवतात. मात्र आरोग्यासाठी हे अजिबात चांगले नसून चहामुळे पोटातील ॲसिड वाढते. त्यामुळे अल्सर किंवा छातीतील जळजळ वाढते.

याप्रमाणेच उठल्यावर कॉफी प्यायल्याने फ्रेश वाटते असे अनेकांचे म्हणणे असते. मात्र शरीरातील हॉर्मोन्सचे संतुलन बिघडण्यास कॉफी कारणीभूत ठरते. एकदा हॉर्मोन्सचे संतुलन बिघडले की ते पूर्वपदावर येण्यास बराच वेळ लागतो.

औषधे

झोपेतून उठल्यावर लगेच औषधे घेऊ नयेत, असा सल्ला डॉक्टरही आपल्या रुग्णांना अनेकदा देतात. अँटीबायोटिक्समधील घटक आतड्यांना त्रासदायक ठरू शकतात. यामुळे आतड्यांच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. या औषधांमुळेही अल्सर होण्याची शक्यता असते.

म्हणून उठल्यावर औषधे घेऊ नयेत.

मसालेदार पदार्थ

सकाळच्या नाश्त्याला तिखट किंवा मसालेदार पदार्थ खाऊ नयेत. मसाले किंवा मिरच्यांमुळे पोटात ॲसिडची निर्मिती होते. यामुळेही अल्सर होऊ शकतो. तिखट पदार्थ सकाळी सकाळी खाल्ल्यामुळे शौचासही त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो तेलकट आणि तिखट पदार्थ नाश्त्याला टाळावेत.

बीयर आणि शीतपेये

सकाळी उठल्यावर शक्यतो कोणी शीतपेये आणि बीयर पीत नाही. मात्र सकाळपासून पोट रिकामे असले आणि एकदम जेवणादरम्यान शीतपेय किंवा बीयर घेतल्यास ते आरोग्यासाठी अतिशय हानीकारक ठरु शकते. रिकाम्या पोटी बीयर घेतल्यास जास्त नशा चढते आणि ते आरोग्यासाठीही हानीकारक असते. शीतपेयांमुळे मळमळणे, ॲसिडिटी अशा समस्या उद्भवू शकतात.

मराठी शाळा वाचविण्यासाठी शिक्षकांचे धरणे सत्याग्रह

१५ मार्च संच मान्यता निर्णय रद्द करण्याची शिक्षकांची मागणी

■ठाणे : प्रलंबित शिक्षक पदवीधर पदोन्नती प्रक्रिया राबविण्यासह १५ मार्च संच मान्यता निर्णय रद्द करावा अशा प्रमुख मागण्यांसाठी ठाणे जिल्हा प्राथमिक शिक्षक समितीतर्फे सोमवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ धरणे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जिल्ह्यातील शेकडो शिक्षक सहभागी झाले होते. 'मराठी शाळा वाचवा', 'ग्रामीण भागातील गोरगरिबांचे शिक्षण वाचवा' अशा आशयाचे फलक हातात घेऊन हे सर्व शिक्षक भर उन्हात रस्त्यावर उतरले होते. राज्यात १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार सन २०२५ ची संच मान्यता अंतिम करून शिक्षक निश्चिती करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मराठी शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षक संख्या कमी होण्याची चिन्हे आहेत. हा शासन निर्णय शिक्षण हक्क कायद्याच्या विसंगत असून या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यास शाळेमध्ये शिक्षकांची संख्या कमी होऊन राज्यांमध्ये जवळपास वीस हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. तर, ठाणे जिल्ह्यात जवळपास साडेतीनशे शिक्षक कमी होणार असल्याचे आंदोलनकाऱ्यांनी सांगितले. तीन-तीन वर्गांना एकच शिक्षक प्रत्येक वर्गाचे नऊ विषय शिकवणार असेल तर, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर याचा परिणाम होण्याची भीती यावेळी शिक्षकांनी वर्तवली. शाळेत शिक्षक नसल्याने पालकांना गावापासून दूरवरच्या शाळेत मुलांना नाईलाजास्तव पाठवावे लागेल. गावात शिक्षक उपलब्ध होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढेलच शिवाय विद्यार्थिनींचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण होईल. यामुळे ग्रामीण भागातील शाळा बंद पडण्याचे भीती आहे. दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर वीस पटाच्या आतील इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतच्या शाळांना शून्य शिक्षक मंजूर नियमात बदल करून एक शिक्षक मंजूर करून अंशतः बदल केला असला तरी, आंदोलनावर ठाम राहत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने ठाणे जिल्ह्यासह सोमवारी राज्यभर आंदोलन केले.

या आहेत मागण्या

- १५ मार्च २०२४ चा संच मान्यता शासन निर्णय रद्द करा.
- ठाणे जिल्हा परिषद शिक्षक कर्मचाऱ्यांचे डीसीपीएस खात्यातील रक्कम एनपीएस खात्यावर वर्ग करा.
- प्रलंबित शिक्षक पदवीधर पदोन्नती प्रक्रिया राबवा

१५ मार्च २०२४ ची संच मान्यता काय आहे?

- इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत पाच वर्गांना वीस पटापर्यंत एकच शिक्षक.
- इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंत तीन वर्गांना वीस पटापर्यंत सर्व विषयांसाठी एकच शिक्षक.
- पूर्वी ६० पटाच्या वर तिसरा शिक्षक मंजूर व्हायचा तो आता ७६ च्या वर मंजूर होणार.

घोडबंदरमध्ये अवैध रेती उपसा... कांदळवनाचे देखील नुकसान

■ठाणे : घोडबंदर येथील वाघबीळ रेतीबंदर परिसरात अवैधरित्या रेती उपसा झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलीस आणि महसूल विभागाच्या पथकाने तीन लाख १६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या रेती उपशामुळे कांदळवनाचे देखील नुकसान झाले आहे.

वाघबीळ येथील रेतीबंदर कासारवडवली पोलिसांना रविवारी दुपारी रेतीने भरलेला टेम्पो आढळून आला. पोलिसांनी त्या टेम्पो चालकाला अडवून त्याची चौकशी केली असता, त्याने ही रेती वाघबीळ रेतीबंदरातून आणल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर कासारवडवली पोलिसांनी याबाबतची माहिती महसूल विभागाच्या भरारी पथकाला दिली. महसूल विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पथकाने रेतीबंदर परिसरात पाहणी केली असता, त्यांना तेथे मोठ्याप्रमाणात अवैधरित्या रेती उत्खनन झाल्याचे समोर आले.

या रेती उपशामुळे कांदळवनाचे नुकसान झाले होते. पथकाने अवैधरित्या उपसा केलेल्या रेती साठ्याची मोजणी केली असता, तीन लाख १६ हजार रुपयांची रेती आढळून आली. त्यानंतर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. या प्रकरणी टेम्पो चालक आणि अज्ञात व्यक्तीविरोधात मंडळ अधिकाऱ्यांनी कासारवडवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५, १९ आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) यानुसार गुन्हा दाखल झाला आहे.

बदलापूरात अंगरक्षकाने चोरले सहकाऱ्याचेच अग्नीशस्त्र... पोलिसांकडून अटक

■बदलापूर : बदलापुरच्या शिंदेंच्या शिवसेनेचे शहरप्रमुख वामन म्हात्रे यांच्या अंगरक्षकाने सहकारी अंगरक्षकाला अडचणीत आणण्यासाठी त्याचे अग्नीशस्त्र चोरल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी जजलाल पांडे या अंगरक्षकाला अटक केली असून त्याच्याकडून अग्नीशस्त्र आणि काडतुसे जप्त केली आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव खासगी अंगरक्षक आणि बंदुकधारी रक्षक सोबत ठेवण्याची पद्धत गेल्या काही वर्षात राजकीय वर्तुळात प्रचलित झाली आहे. बदलापूर शहरातील शिंदेंच्या शिवसेनेचे शहरप्रमुख आणि कुळगाव बदलापूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनीही आपल्याकडे खासगी अंगरक्षक ठेवले आहे. यातील एका अंगरक्षकाने दुसऱ्या अंगरक्षकाचे अग्नीशस्त्र चोरल्याचा प्रकार समोर आला आहे. वामन म्हात्रे यांच्याकडे मुळचे उत्तर प्रदेश येथील प्रयागराजचे राहणारे जजलाल बुलंद पांडे आणि कृष्णाप्रसाद तिवारी हे दोघेही खासगी अंगरक्षक म्हणून कार्यरत आहेत. या दोघांकडेही परवाना असलेले अग्नीशस्त्र आहे.

यापैकी कृष्णा प्रसाद तिवारी हा १४ मार्च रोजी होळीच्या दिवशी आपले काम संपवून म्हात्रे यांच्या एरंजाड येथील शेतघरावर विश्रांती घेत होता. यावेळी त्याची आठ काडतुसे असलेले अग्नीशस्त्र त्याने जवळच उशाखाली ठेवली होती. काही वेळाने कृष्णा उठून अंघोळीला गेला. मात्र पुन्हा परतल्यानंतर त्याला त्याचे अग्नीशस्त्र आणि मोबाईल दिसले नाही. अग्नीशस्त्र आणि मोबाईल गहाळ झाल्याचे कळता त्याने बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. त्यानंतर याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या प्रकरणाच्या तपासात पोलिसांना म्हात्रेंचा दुसरा अंगरक्षक जजलाल पांडे याच्यावर संशय आल्याने त्यांनी त्याला ताब्यात घेतले. यावेळी पोलिसी खाक्या दाखवताच त्याने कृष्णा याला अडचणीत आणण्यासाठी आपण त्याचे अग्नीशस्त्र आणि मोबाईल चोरल्याचे कबूल केले. या प्रकरणी पोलिसांनी जजलाल पांडे याला अटक केली आहे. त्याच्याकडून कृष्णाप्रसाद तिवारी याचे अग्नीशस्त्र, ४ काडतुसे, मोबाईल तसेच जजलाल पांडे याचे अग्नीशस्त्र, १८ जिवंत काडतुसे, ७ रिकाम्या पुंगळ्या आणि मोबाईल असा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

जाहिरातीपोटी २५ कलाकारांचे दीड कोटी थकवले
पोलिसांनी पाच जणांविरोधात गुन्हा

■मुंबई : जाहिरातीसाठी २५ कलाकारांना बोलवून त्यांच मानधन बुडवून सुमारे दीड कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी चेंबूर पोलिसांनी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला. या जाहिरातीसाठी अभिनेत्री अंकिता लोखंडे, आयुष शर्मा, आद्रीजा रॉय यांच्यासह २५ कलाकारांना बोलवण्यात आले होते. सेलेब्रीटी मॅनेजर म्हणून काम करणाऱ्या महिलेच्या तक्रारीवरून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अंधेरी (प.) येथील रहिवासी असलेल्या तक्रारदार रोशन बिंदर (४८) यांची आयमन इंटरटेन्मेट नावाची कंपनी असून ते कार्यक्रम व जाहिरातीसाठी सेलेब्रीटी उपलब्ध करून देण्याच काम करतात. त्यांना जुलै २०२४ मध्ये एका व्यक्तीने दूरध्वनी केला होता. एनर्जी ड्रींकची निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या जाहिरातीसाठी २५ कलाकारांचीआवश्यकता असल्याचे त्याने बिंदर यांना सांगितले. बिंदर यांनी होकार दिल्यानंतर आरोपींनी त्यांना १० लाख रुपये आगाऊ पाठवल्याची पावती पाठवली. पण तक्रारदारांच्या खात्यात कोणतीही रक्कम जमा झाली नाही. त्यानंतर आरोपीने तक्रारदाराला दादर येथील पार्टीमध्ये कलाकारांना आणण्यास सांगितले.

अर्जुल बिजलानी, अभिषेक बजाज, हर्ष राजपुत यांच्यासह १०० कलाकार तेथे पोहोचले. आरोपींनी त्यापैकी २५ कलाकारांची जाहिरातीसाठी निवड केली. त्या सर्वांचे मिळून एक कोटी ३२ लाख रुपये मानधन ठरवण्यात आली. त्यासाठी तक्रारदाराला १५ लाख रुपयांच्या धनादेशाचे छायाचित्र पाठवण्यात आले. ती रक्कम खात्यात जमा होईल, असे सांगण्यात आले. धनादेशाचे छायाचित्र पाहून तक्रारदाराने कलाकारांसोबत रिल्स बनवण्याचे काम सुरू केले. त्या समाज माध्यमांवर अपलोड झाल्यानंतर ३५ दिवसांत सर्वांचे पैसे दिले जातील असे ठरले होते. त्यावेळी दादर येथील पार्टीत सहभागी झालेल्या कलाकारांना दोन लाख व ९० हजार रुपयांचे दोन धनादेश देण्यात आले होते.

ते वठले नाही. त्यावेळी एका आरोपीशी संपर्क साधला असता त्याने आपण दुबईत असून येथील चलनानुसार २२ लाख ५० हजार रुपये तक्रारदार महिलेला पाठवल्याचे सांगितले. पण दोन दिवस झाले, तरी ती रक्कम तक्रारदार महिलेच्या खात्यावर जमा झाली नाही. तक्रारीनुसार, आरोपींनी सिने कलाकार तेजस्वी प्रकाश यास दिलेला साडेसहा लाखांचा व अद्रीजा रॉय हिला दिलेला सव्वा लाखांचा धनादेशही वठला नाही. त्यनंतर आरोपीने १८ ऑक्टोबर २०२४ रोजी तक्रारदारांच्या कंपनीच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी ३५ लाख व ४५ लाख रुपयांचे दोन धनादेश तयार केले. ती रक्कम दोन दिवसांत जमा होईल, असे सांगितले.

त्यामुळे तक्रारदार महिलेने कलाकार जय भानुशाली, भूमिका गुरांग, अंकिता लोखंडे, आयुश शर्मा, सना सुलतान, कुशल टंडन, आद्रिजा रॉय, बसिन, अभिशेक बजाज यांना त्यांच्या कामाची आगाऊ रक्कम म्हणून ३५ लाख रुपयांचा धनादेश दिला. पण आरोपीने दिलेला ८० लाखांचा धनादेश वठला नाही. त्यामुळे तक्रारदार महिलेने कलाकारांना दिलेले धनादेशही वठले नाही. अशा प्रकारे कलाकारांसाठी ठरलेले एक कोटी ३२ लाख व तक्रारदार महिलेची १६ लाख ९१ हजार रुपयांची फसवणूक झाली, असे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी मध्य प्रदेशातील रहिवाशासह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठाण्यातील गृहसंकुलांबाहेर कचऱ्याचे ढिग
घरोघरी कचरा संकलनाचे काम तत्काळ सुरू करण्याचे पालिका आयुक्तांचे आदेश

■ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रातील सीपी तलाव कचरा हस्तांतरण केंद्रावर कचरा टाकण्यास विरोध झाल्यानंतर येथील साठलेला कचरा भिवंडीतील आतकोली येथील कचराभूमीवर नेण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी, घंटागाडीद्वारे घरोघरी संकलन होणाऱ्या कचऱ्याची वाहतूक ठप्प झाली असून यामुळे गृहसंकुलांबाहेर तसेच रस्त्यावर अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिग लागले आहेत. यावरून टीका होऊ लागताच, घंटागाड्यांमार्फत होणारे, घरोघरी कचरा संकलनाचे काम तत्काळ सुरू करण्याचे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी घनकचरा विभागाला दिले आहेत.

आयुक्त सौरभ राव यांनी रविवारी सायंकाळी पुन्हा एकदा वागळे इस्टेट येथील सीपी टॅंक या कचरा हस्तांतरण प्रकल्पाला भेट दिली. तेथे साठलेला कचरा लवकरात लवकर आतकोली येथे पाठवण्यासाठी केलेल्या नियोजनाचा त्यांनी आढावा घेतला. या भेटीच्या वेळी, आयुक्त प्रशांत रोडे उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) मनीष जोशी, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

बुधवार, १२ मार्चपासून, सीपी टॅंक येथे साचलेला कचरा २४ तास आणि तीन सत्रांमध्ये काम करून आतकोली येथील क्षेपणभूमीवर पाठवण्यात येत आहे. दिवसाला सरासरी ९० वाहने हा कचरा नेत असून आतापर्यंत सुमारे सात हजार मेट्रिक टन कचरा सीपी टॅंक येथून आतकोली येथील कचराभूमीवर नेण्यात आला आहे. आतकोली येथे पाठवण्यात आलेल्या कचऱ्यावर दुर्गंध पसरू नये म्हणून सुगंध फवारणी करणे, तसेच मातीचा थर देणे आधी शास्त्रोक्त पद्धतीने काम सुरू असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले.

ठाण्यातील घनकचरा समस्येवर मात करण्यासाठी सीपी तलाव येथील कचऱ्याचे मौजे आतकोली येथील कचराभूमीवर हस्तांतरण सुरू झाले असून आता घंटागाड्यांमार्फत होणारे, घरोघरी कचरा संकलनाचे काम तत्काळ सुरू करण्याचे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी घनकचरा विभागाला दिले आहेत.

गृहसंकुलांबाहेर तसेच रस्त्यावर अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिग लागले आहेत. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून याचबरोबर नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. यावरून पालिका प्रशासनावर टीका होत असून त्यावर आयुक्त राव यांनी प्रशासनाला महत्वाचे निर्देश दिले आहेत.

सीपी टॅंक येथील कचरा हस्तांतरण प्रक्रिया वेगाने सुरू झाली असल्याने आता शहरात साठलेला कचराही लवकरात लवकर उचलला जावा. त्याचबरोबर, घंटागाड्यांद्वारे नियमितपणे केली जाणारी, घरोघरी कचरा संकलनाची व्यवस्था तत्काळ कार्यान्वित करावी, असे निर्देश या पाहणीनंतर आयुक्त राव यांनी दिले.

मुंबईत पावणेसहा कोटींच्या सायबर फसवणूकीप्रकरणी एकाला अटक

■मुंबई : मानवी तस्करीप्रकरणी दाखल गुन्ह्यात सहभाग असल्याची भीती दाखवून महिलेची पावणेसहा कोटी रुपयांची सायबर फसवणूक केल्याप्रकरणी २१ वर्षीय तरूणाला अटक करण्यात दक्षिण प्रादेशिक सायबर पोलिसांना यश आले आले. आरोपीने सायबर फसवणूक करणाऱ्यांना बँक खाते उपलब्ध करून दिले होते. त्या बँक खात्यात फसवणूकीतील रक्कम आल्याचा आरोप आहे.

जाहाद जैउल्ल्हा खान (२१) असे अटक आरोपीचे नाव असून तो मिरा रोड पूर्व येथील रहिवासी आहे. याप्रकरणी दक्षिण प्रादेशिक सायबर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१९ (२), ३१८ (४), ३३६ (२), ३३५ (३), ३४० (२), ६१ (१), २०४ व माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायदा कलम ६६ (क) व ६६ (ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तक्रारदार महिलेला २३ सप्टेंबर २०२४ रोजी तोतया पोलिसाचा दूरधवनी आला होता. तोतया अधिकाऱ्याने आपले नाव सावंत असल्याचे सांगितले. त्यांच्या आधारकार्डचा वापर करून सीमाकार्ड खरेदी केले असून त्याचा वापर मानवी तस्करीसाठी करण्यात आल्याचे त्याने तक्रारदार महिलेला सांगितले. सीमकार्डद्वारे आर्थिक गैरव्यवहारही करण्यात आल्याचे त्याने तक्रारदार महिलेला सांगितले. त्यानंतर केंद्रीय यंत्रणांमधून अलोक व मिश्रा नावाने तक्रारदार महिलेला व्हिडिओ कॉल करण्यात आले.

भारतीय नागरिकांना बेकायदेशीरपणे परदेशात पाठवून त्यांच्याकडून खंडणी उकळण्यात आली असून ही रक्कम खासगी बँकेच्या खात्यात जमा झाली. ते खाते तक्रारदारांच्या आधारकार्डाद्वारे उघडण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर तक्रारदारांना ऑनलाईन लिंक पाठवण्यात आली. त्यात त्यांच्या नावाचा वॉरंट व मालमत्ता जप्तीचे आदेश होते. त्यामुळे तक्रारदार महिला घाबरल्या. अधिकाऱ्याने तक्रारदार महिलेला अटकेची भीती घातली आणि अटक टाळण्यासाठी गैरव्यवहाराच्या रकमेतील सुरक्षा ठेव म्हणून बँक खात्यात पाच कोटी ८८ लाख रुपये जमा करण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार महिलेने आरटीजीएसद्वारे पाच कोटी ८८ लाख ८६ हजार ९५७ रुपये आरोपींनी सांगितलेल्या विविध बँक खात्यात जमा केले.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने तात्काळ याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार दक्षिण प्रादेशिक सायबर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला. बँक व्यवहारांच्या मदतीने तपास केला असता त्यातील पाच लाख रुपये आरोपी खानच्या बँक खात्यात जमा झाल्याचे निदर्शनास आले. ती रक्कम काढण्यातही खानचा सहभाग निष्पन्न झाल्यानंतर अखेर सायबर पोलिसांच्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले. गुन्ह्यांत त्याचा सहभाग स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली.

शास्त्रीनगर रुग्णालयातील महिलेच्या मृत्यूप्रकरणी बाह्यस्त्रोत संस्थेवर कारवाई करा

■डोंबिवली : कल्याण डोंबिवली पालिकेच्या डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयात गेल्या महिन्यात सुवर्णा सरोदे (२६) या गर्भवती महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला होता. या मृत्यूला पालिकेने नियुक्त केलेल्या नवी मुंबईतील मे. एमके फॅसिलिटीस सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड या एजन्सीतील दोन स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टर जबाबदार असल्याचा ठपका पालिका उपायुक्त प्रसाद बोरकर समितीने ठेवला आहे. बाह्यस्त्रोत संस्थेतील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे सुवर्णा सरोदे यांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे मे. एमके फॅसिलिटीस सर्व्हेसि या संस्थेवर बडतर्फीची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे डोंबिवली जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय महिला आयोगाकडे केली आहे.

सुवर्णा यांच्यावर सिझरिन शस्त्रक्रिया करणाऱ्या, शस्त्रक्रियेनंतर निष्काळजीपणा करणाऱ्या डॉ. मीनाक्षी केंद्रे, डॉ. संगीता पाटील या दोन्ही स्त्रीरोग तज्ञ डॉक्टरांवरही कारवाई करण्यात यावी. सुवर्णा यांच्या कुटुंबीयांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी जिल्हाप्रमुख म्हात्रे यांनी केली आहे. गेल्या महिन्यात डोंबिवलीत मोठागावमध्ये राहणाऱ्या सुवर्णा सरोदे या प्रसूतीसाठी पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात दाखल झाल्या होत्या. त्यांची पहिली सिझरिन शस्त्रक्रिया झाली असल्याने दुसऱ्यांदा बाह्यस्त्रोत संस्थेच्या डॉ. संगीता पाटील यांनी त्यांची सिझरिन शस्त्रक्रिया केली. या शस्त्रक्रियेनंतर सुवर्णा यांची प्रकृती ढासळत गेली. पालिकेच्या पॅनलवरील वरिष्ठ तज्ञ डॉक्टरांनी रात्री उशिरापर्यंत सुवर्णा यांच्यावर उपचार करून त्यांना सुस्थितीत करण्याचा प्रयत्न केला. ते प्रयत्न असफल झाले. रात्री उशिरा सुवर्णा यांचा मृत्यू झाला होता.

सुवर्णा यांच्या मृत्यूनंतर आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, पालिका उपायुक्त प्रसाद बोरकर यांच्या दोन स्वतंत्र चौकशी समित्या स्थापन केल्या होत्या. उपायुक्त बोरकर समितीने प्रशासकीय त्रुटी, हलगर्जीपणाचा विचार करून या प्रकरणाची चौकशी केली. या चौकशीत बाह्यस्त्रोत संस्थेचे डॉ. मीनाक्षी केंद्रे, डॉ. संगीता पाटील यांच्यावर ठपका ठेऊन त्यांना जिल्हा शल्य चिकित्सकांचा अहवाल येईपर्यंत कमी करणे योग्य होईल, असे मत समितीने नोंदवले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी याविषयी शासनस्तरावर आवाज उठविणे आवश्यक होते, असे म्हात्रे यांनी म्हटले आहे.

कल्याणमध्ये बैलबाजार चौकात एमडी पावडरची तस्करी करणारा अटकेत

■कल्याण : कल्याण पश्चिमेतील बैलबाजार भागात एक इसम मेफोड्रिन (एमडी) पावडरची तस्करी करत आहे, याची माहिती पोलीस उपायुक्तांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या पथकाने सापळा लावून बैलबाजार भागातून लाखो रुपए किमतीची सात ग्रॅम वजनाची एमडी पावडर पोलीस पथकाने जप्त केली आणि या पावडरची तस्करी करणाऱ्या इसमाला अटक केली.

माताफ अनिस रईस (३३, रा. जुने मच्छी मार्केट, गोल्ड प्लाझा इमारत, कल्याण पश्चिम) असे अटक करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. गेल्या चार महिन्यात कल्याण पश्चिमेतील कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती परिसर, बाजारपेठ विभाग, बैलबाजार भागातून गांजा, एमडी पावडरची तस्करी करणाऱ्या इसमांना अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. सततची कारवाई करूनही अंमली पदार्थांचे तस्कर तस्करी थांबवत नसल्याने पोलीस हैराण आहेत.

महात्मा फुल पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विरोध पथक गस्त घालत होते. त्यावेळी त्यांना बैलबाजार चौकात एक इसम संशयास्पदरित्या आढळून आला. या भागात अंमली पदार्थांची चोरून तस्करी होत असते याची जाणीव पथकाला होती. त्यामुळे त्यांनी संशयास्पदरित्या इसमाला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली. त्यांच्या अंगझडतीत पथकाला प्रतिबंधित एमडी पावडर आढळून आली. आपणास खबर मिळालेला इसम हाच तो आहे याची खात्री पटल्यावर पथकाने त्याला अटक केली. त्याच्यावर अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या इसमाने ही एमडी पावडर कोठुन आणली. तो ती कोणाला विक्री करणार होता. तो हा तस्करीचा व्यवसाय कधीपासून करतो या दिशेने पोलीस पथक तपास करत आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या कल्याण, डोंबिवली शहराच्या भागात सतत गस्त असल्याने यापूर्वीच गांजा, एमडी पावडर तस्करीचे बहुतांशी अड्डे बंद पडले आहेत. कल्याण, डोंबिवली नशामुक्त करण्याचे जोरदार अभियान पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी शहरात सुरू केले आहे. त्याचे दृश्य परिणाम आता दिसू लागले आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com